# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 08.06.2025** **वार- रविवार**

---

मुख्यमंत्री-पुणे

आशिया खंडातील सर्वात मोठा सौरऊर्जा प्रकल्प राज्यात सुरू असून तो 2026 पर्यंत पूर्ण केला जाणार आहे. या प्रकल्पामुळे राज्यातील उर्जेची गरज भागवण्यास मोठी मदत होणार आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात बोलताना केलं. औंध येथे महाऊर्जाच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. राज्यातील सर्व शासकीय कार्यालयात डिसेंबर 2025 पर्यंत सौर ऊर्जेचा वापर सुरू करणार असून प्रधानमंत्री सूर्य घर योजना राज्यात प्रभावीपणे राबविणार असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

दरम्यान, मावळ तालुक्यातील आंबी- तरंगवाडी येथील पुष्पलता डी. वाय. पाटील रुग्णालयाचं उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज करण्यात आलं. संपूर्ण राज्यात प्राथमिक आरोग्य सेवांचे जाळे निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार असल्याचं ते यावेळी बोलताना म्हणाले.

**अ.भा.म.सा.संमेलन**

99 वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साताऱ्याला होणार आहे. ते आयोजित करण्याचा मान साताऱ्यातील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाहूपुरी शाखेला आणि मावळा फौंडेशनला मिळणार आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या आज पुणे इथं झालेल्या बैठकीत एकमतानं हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती अखिल भारतीय

मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्राध्यापक मिलिंद जोशी यांनी दिली. साताऱ्यात होणारं हे 4 थं संमेलन आहे.

**<u>पिकसपर्धा-निकाल</u>**

राज्य सरकारतर्फे घेण्यात आलेलेया 'खरीप हंगाम 2024' पीक स्पर्धेचा राज्यस्तरीय निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. यामध्ये पुणे जिल्ह्यातील दोन शेतकऱ्यांनी भातशेतीमध्ये प्रथम आणि द्वितीय क्रमांक पटकावला आहे. भातपिकामध्ये आदिवासी गटातून दिग्गदचे  आंबेगाव येथील सुरेश विरणक यांचा पहिला तर जुन्नर येथील सुदाम सरोगदे यांनी दुसरा क्रमांक पटकावला आहे.

**<u>कृषीपर्यटन</u>**

शेतीला जोडव्यवसाय म्हणून कृषी पर्यटन व्यवसाय उभारल्या, शेतकरी समृद्ध होईल, असं प्रतिपादन अभिनेते मिलिंद शिंदे यांनी आज पुण्यात केलं. जागतिक कृषी पर्यटन दिनानिमित्त 'महाराष्ट्र कृषी पर्यटन परिसंवाद 2025' या कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी 'शासकीय धोरणे आणि कृषी पर्यटनाचा विकास' या विषयावर मान्यवरांनी विचार मांडले.

**<u>कीर्तनशिक्षकपुरस्कार</u>**

श्रीहरिकीर्तनोत्तेजक सभेच्या वतीने देण्यात येणारा पहिला कीर्तनशिक्षक पुरस्कार, काल ज्येष्ठ कीर्तनकार कमलताई पराडकर यांना प्रदान करण्यात आला. पुण्यातील नारद विद्या मंदिरात गेले सव्वा महिना सुरू असलेल्या, वासंतिक कीर्तन वर्गाच्या समारोप समारंभात, या पुरस्कारासह बाल ते प्रशिक्षण अश्या सहा कीर्तन वर्गातील गुणानुक्रमे पहिल्या तीन प्रशिक्षणार्थींचा गौरव देखील करण्यात आला. कीर्तन कलानिधी रामचंद्र भिडे कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी होते. सकाळ सोशल फौन्डेशनचे राहुल गरड, संचालिका नंदिनी पाटील, यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

**<u>मनपा-रिक्तपदे</u>**

पुणे महापालिकेत सध्या विविध विभागांतील सुमारे  7 हजार 336 पदे रिक्त आहेत. यामध्ये सर्वाधिक रिक्त पदे वर्ग तीन आणि वर्ग चारची असल्याची माहिती महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागातील अधिकाऱ्यांनी दिली

**<u>भाज्याआवक</u>**

गुलटेकडी इथल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज राज्यासह, विविध राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. पावसामुळे बहुतांश पालेभाज्यांचे दर तेजीत आहत. फुल बाजाराला देखील पावसाचा फटका बसला असून आवक मोठ्या प्रमाणावर घटली आहे.

**<u>सफाईकर्मचारी</u>**

आमदार हेमंत रासने यांच्या नेतृत्वाखाली ‘स्वच्छ, सुंदर आणि विकसित कसबा’ हे अभियान राबवले जात आहे. रासने यांनी आज विश्रामबाग क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व आरोग्य कोठ्यांना आज भेट देऊन तेथील कार्माचार्यांशी संवाद साधला. या सर्व कामांमध्ये सफाई कर्मचाऱ्यांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचं रासने यांनी यावेळी नमूद केलं. या अभियानाअंतर्गत विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत.

**<u>मैदानीस्पर्धा</u>**

द पुणे जिल्हा हौशी अथलेटिक्स संघटना यांच्या वतीने म्हाळुंगे बालेवाडी इथल्या  क्रीडा संकुलात मैदानी स्पर्धा सुरू झाल्या आहेत. पुरुष गटाच्या 10 हजार मीटर धावणे प्रकारात मृणाल सरोदे याने दुहेरी मुकुट पटकावला. महिला गटात, 100 मीटर धावणे प्रकारात अवंतिका नराळे, 800 मीटर धावणे प्रकारात शिवेच्छा पाटील आणि थाळीफेक प्रकारात भक्ती गावडे यांनी अव्वल स्थान मिळवले.

**<u>हवामान</u>**

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल 32 आणि किमान 22 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली. आज आकाश अंशतः ढगाळ होत. उद्या

देखील अशाच प्रकारचं हवामान राहून पावसाच्या हलक्या सारी पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**